# महाराष्ट्र राज्य औषध व्यवसाय परिषद

(भारत सरकारच्या औषध व्यवसाय अधिनियम १९४८ चा ८ वा अंतर्गत घटित)

# MAHARASHTRA STATE PHARMACY COUNCIL

(Constituted under The Pharmacy Act, 8 of 1948 of Government of India)

## महत्त्वाचे

महाराष्ट्र राज्य औषध व्यवसाय परिषद ही स्वायत्त संस्था औषध व्यवसाय अधिनियम १९४८ (केंद्रीय कायदा) अंतर्गत तरतुदीनुसार महाराष्ट्र राज्य शासनाने गठीत केली असून औषध व्यवसाय अधिनियम १९४८ची अंमलबजावणी व औषध विषयक पेशा व व्यवसाय यांचे नियमन करणे हे या परिषदेचे कार्य आहे.

परिषदेकडून सदर कायद्याच्या कलम ३२(२) अंतर्गत तरतुदींच्या अधीन राहून औषध व्यवसायींचे पंजीकरण केले जाते. अशा नोंदणीकृत सर्व पंजीकृत औषध व्यवसायींवर मुख्यत्वे औषध व्यवसाय अधिनियम १९४८ व फार्मसी प्रॅक्टिस रेग्यूलेशन २०१५च्या तरतुदींचे व इतर अनुषंगिक कायद्यांचे अनुपालन करणे बंधनकारक आहे. फार्मासिस्ट हा औषधे व रूग्ण यामधील महत्त्वाचा दुवा आहे. कोविड योध्दा म्हणून त्यांचे योगदान अपेक्षित आहे

**सद्यस्थितीत कोविड -१९ची परिस्थिती अतिशय गंभीर झाली असून त्याकरीता वापरण्यात येणारी औषधे, इंजेक्शन व इतर फार्मसी संबंधीत साहित्याची मागणी मोठ्याप्रमाणात वाढली आहे. त्या अनुषंगाने सदर औषधे, इंजेक्शन व इतर फार्मसी संबंधीत साहित्याची चोरी, काळाबाजार, बनावट निर्मिती यासारख्या घटना घडत असल्याचे निदर्शनास येत आहे. जे जनहितास बाधा आणणारे आहे. काही फार्मासिस्टचा अत्यंत मोजक्या प्रकरणांमध्ये प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष सहभाग काही बातम्यांमधून निदर्शनास येत आहे. काही मूठभर फार्मासिस्टच्या या दुष्कृत्यामुळे फार्मासिस्टची जनमानसातील प्रतिमा मलिन होत आहे. परिषदेतर्फे याची गांभीर्याने दखल घेण्यात येत आहे.**

याद्वारे सर्व पंजीकृत औषध व्यवसायींना सूचीत करण्यात येते की, महाराष्ट्र राज्यात घडलेल्या उपरोक्त घटनांमध्ये काही पंजीकृत औषध व्यवसायींचा सहभाग असल्याचे निदर्शनास आल्याने त्यांचेवर औषध व्यवसाय अधिनियम १९४८च्या कलम ३६ व फार्मसी प्रॅक्टिस रेग्यूलेशन २०१५च्या तरतुदींच्या अधीन राहून कडक कारवाई सुरू केली असून भविष्यात देखील अशी प्रकरणे निदर्शनास आल्यास कडक कारवाई घेतली जाईल अशी परिषदेची भूमिका आहे. याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

विजय पांडुरंग पाटील
अध्यक्ष

सायली स्वप्नील मसाल
निबंधक

दिनांक : १४ मे २०२१

R-Square, 4th Floor, Opp. E.S.I.S. Hospital, Lal Bahadur Shastri Marg, Mulund (W), Mumbai – 400 080, Maharashtra, India
Tel.No. 91-22-25684291/25684418 E-mail :- mspcindia@gmail.com Website :- www.mspcindia.org